
१६ ते ३० एप्रिल २०२३ । किंमत २५ रु.
(एकूण पृष्ठे ५२)

# परिवर्तनाचा वाटसरु






३०

# आलोक
## कालावकाशाची संरचना



प्रकाशन दिनांक १६-४-२०२३

परिवर्तनाचा

# वाटसरू

वर्ष २२वे / अंक २४वा / किं. २५ रु. / १६ ते ३० एप्रिल २०२३

**संस्थापक संपादक**

अभय कांता*

**संपादक**

प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**

देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**

प्रज्वला तट्टे । वीरा राठोड । कलीम अजीम । राही श्रु. ग. । वृषाली मगदूम

**व्यवस्थापक**

प्रकाश वाघमारे

**संपर्क पत्ता**

५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११

भ्र. ९७६३२०६२१२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १,६०० रु., दशवार्षिक : ५,००० रु., **सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक** २०० रु., सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील

बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : Pariwartanacha Vatsaru

बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014

Google Pay साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

अनुक्रम


**पेच लोकशाहीचा**

**हिंडेनबर्ग बनाम अदानी और संसद मे सन्नाटा** ५

विजय कुंजीर

**विशेष लेख**

**संस्कृतीमीमांसेची पूर्वपीठिका** १२

राहुल पुंगलिया

**कादंबरीच्या सत्यशोधात –५**

**पाटील–कुळकर्णी** २१

प्रवीण चव्हाण

**संशोधन**

**'आलोक' या कथासंग्रहातील कालावकाशाची संरचना** ३०

शैलेश औटी

**साहित्याभ्यास**

**अंजली कुलकर्णी यांच्या कवितेतील स्त्रीवादी संवेदन** ४१

कीर्ती जाधव

**गालिब : हृदयस्पर्शी कलाकार** ४६

बालाजी घारुळे

**कविता**

मलिका अमर शेख ५०

अरुणचंद्र गवळी ५०


परिवर्तनाचा वाटसरू

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# 'आलोक' या कथासंग्रहातील कालावकाशाची संरचना

शैलेश औटी

समकालीन ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे, या ग्रामजीवनामधील विविध समस्यांचा वेध घेणारे लेखक आणि पत्रकार म्हणून आसाराम लोमटे हे मराठी साहित्यविश्वाला परिचित आहेत. 'आलोक' हा त्यांचा कथासंग्रह मार्च २०१०मध्ये प्रकाशित झाला. या संग्रहातील कथा २००७ ते २००९ या कालखंडात विविध दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध झाल्या आहेत. प्रस्तुत लेखाच्या मर्यादेत 'आलोक' या कथासंग्रहातील कालावकाशाची संरचना हे अंग विवेचनासाठी घेतले आहे. 'समकालीन ग्रामजीवन' या शब्दप्रयोगात काळ आणि अवकाशाचा जो संदर्भ आला आहे त्याचे अधिक सखोल रीतीने विश्लेषण करणे हा या लेखाचा हेतू आहे. प्रत्यक्षातील व्यक्ती, नैसर्गिक काळ आणि मूर्त अवकाश यांच्यावर लेखकीय जाणीवेचे आणि साहित्यप्रकाराचे संस्कार होऊन पात्रे, स्थळ-काळ, वातावरण या रूपाने ते साहित्यकृतीच्या कलात्मक अवकाशात प्रविष्ट होत असतात. कालावकाशांची निवड ही लेखकीय मूल्यदृष्टी आणि आशयसूत्रांची दिशा यांच्याशी संबंधित असते. कथेत वास्तवाचे प्रतिरूपण करताना जे काळ आणि अवकाश प्रविष्ट होतात त्यांना निवेदक तसेच विविध पात्रांच्या माध्यमातून व्यक्तिजाणीवेचे परिमाण लाभते आणि ते वाचकाशी संवाद साधू लागतात. वास्तवातही व्यक्तिजाणीवेवर काळ आणि अवकाश यांचा मोठाच प्रभाव असतो. या कथासंग्रहातून ज्या ग्रामजीवनाचा संदर्भ येतो तो ग्रामीण अवकाश हा (ज्याची बराच काळ मोगलाई म्हणून ओळख होती अशा) मराठवाड्याच्या परिसरातील आहे हे काही ऐतिहासिक घटनांचे उल्लेख, स्थलनामे तसेच निवेदक आणि पात्रांच्या संभाषितामधून येणाऱ्या विविध भाषिक रूपांवरून सूचित होते हे या कथासंग्रहाचे वास्तविक कालावकाशांशी असणारे थेट संबंध म्हणता येतील.

या विश्लेषणामध्ये योजलेल्या कालावकाश या संज्ञेचे ऐतिहासिक आणि तात्त्विक स्वरूप प्रथम अगदी थोडक्यात समजावून घेणे आवश्यक आहे.

कालावकाश (Chronotope) ही मुळात भौतिक विज्ञाने आणि गणितासारख्या शुद्ध तर्काधिष्ठित शास्त्रांमधे योजिली जाणारी संकल्पना आहे. या संज्ञेत ग्रीक भाषेतील chronos (time- काळ)आणि Topos (space- अवकाश) या दोन संज्ञांचा समावेश होतो. मिखाईल बाख्तीन या रशियन विचारवंत आणि साहित्याभ्यासकाने वाङ्मयीन आणि सांस्कृतिक अभ्यासाच्या म्हणजे मानव्यविद्येच्या क्षेत्रात तिचा वापर

लेखक वसई, जि. पालघर येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात मराठीचे सहाय्यक प्राध्यापक आहेत.
shailauti2016@gmail.com

करून साहित्याभ्यासाला तसेच संस्कृतीच्या अभ्यासाला एक अभिनव परिमाण प्राप्त करून दिले. 'साहित्यात कलात्मकरित्या प्रकट केलेल्या कालिक आणि अवकाशीय संबंधांचा आंतरिक अनुबंध अथवा जोडलेपणा' अशी कालावकाश या संज्ञेची व्याख्या केली जाते. मूलत: अन्य क्षेत्रातून आयात केले असले तरी, कालावकाश हे साहित्याच्या विश्लेषणासाठी चौकट प्राप्त करून देणारे एक अत्यंत सामर्थ्यशाली आणि लवचीक साधन असल्याचे दिसून येते.

आपल्या "The Dialogic Imagination' या ग्रंथात कादंबरीच्या साहित्यशास्त्राची मांडणी करताना "Forms of time and of the chronotope in the novel' या प्रदीर्घ निबंधातून बाख्तीनने ही संकल्पना कादंबरीच्या रूपाच्या संदर्भात मांडली आहे. बाख्तीनने इसवीसनाच्या दुसऱ्या शतकामधील विविध कथनरूपांपासून ते आधुनिक युरोपियन कादंबरीपर्यंतच्या विविध कथनरूपांचा परामर्श घेतला आहे. त्याने सुमारे १८०० वर्षांचा प्रदीर्घ कालपट समोर ठेवत कालावकाश या तत्त्वाच्या साहाय्याने युरोपियन कादंबरीच्या रूपबंधाचा शोध घेतला आहे. 'साहित्याची रूपदृष्ट्या बांधणी करणारी कोटी' असा कालावकाशाचा अर्थ केंद्रस्थानी ठेवून त्याने ही मांडणी केली आहे.

कालावकाश या संज्ञेमध्ये काळ आणि अवकाश (Time and Space) अशा दोन तत्त्वांचा समावेश होतो मात्र काळ आणि अवकाश यांचे एकमेकांशी केवळ वरवरचे मिश्रण नव्हे तर त्यांचा परस्परसंयोग अथवा काळ आणि अवकाश यांचे अविभक्तत्व या संकल्पनेत अभिप्रेत आहे. काळ आणि अवकाश या मानवी अनुभवाच्या मूलभूत कोटी आहेत. काळ आणि अवकाशाच्या मध्यस्थीशिवाय कोणताही लौकिक पातळीवरील अनुभव शक्य नसतो. व्यक्ती अथवा समाज काळाचा अनुभव घेत असतात. त्यातून व्यक्तिगत काळाचा तसेच नैसर्गिक काळाचा अनुभव प्राप्त होतो. काळ ही अपार आणि अमर्याद मानली जाणारी कोटी असली तरी कथनात्म साहित्यकृतीमधे कथेतील घटना आणि पात्रांच्या जाणीवेच्या संदर्भात प्रतिरूपित केलेला काळाचा मर्यादित तुकडा आपल्यासमोर असतो. कथनात्म साहित्यकृतीमधे काळाचे अस्तित्व हे केवळ एक पुनरावर्ती घटक इतके मर्यादित राहात नाही तर कथा आणि कथनात्म संहिता या दोहोंना संघटित करणारे तत्त्व म्हणून काळाचे अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. कथनात्म साहित्यकृतीचे वाचन करत असताना कथनात्म संकेतांच्या साहाय्याने वाचक कथेतील आणि कथनात्म संहितेतील काळाचा तसेच घटनांच्या क्रमाचा अनुभव घेत असतो.

कालावकाश ही संज्ञा मिखाइल बाख्तीन या अभ्यासकाने आपल्या 'द डायलॉजिक इमॅजिनेशन' या ग्रंथातून कादंबरीच्या साहित्यशास्त्राची मांडणी करताना सर्वप्रथम मांडली. आपल्या विवेचनात बाख्तीनने काळाचे अवकाशाशी असणारे अविभक्तत्व कालावकाश या संज्ञेमधून व्यक्त केले आहे. या विवेचनात त्याने काळाला अवकाशाची चौथी मिती असे संबोधले आहे. 'साहित्याची रूपदृष्ट्या बांधणी करणारी कोटी' असा कालावकाशाचा अर्थ केंद्रस्थानी ठेवून त्याने ही मांडणी केली आहे. उपरोल्लेखित ग्रंथातील, "Forms of time and of chronotope in the novel' या प्रदीर्घ निबंधातून बाख्तीनने कादंबरीच्या ऐतिहासिक साहित्यशास्त्राची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.[१] काळ आणि अवकाश यांचे कादंबरीच्या इतिहासातील बदलते स्वरूप आणि त्यानुसार कादंबरी या साहित्यप्रकाराच्या रूपामध्ये होणारे बदल यांचा ऐतिहासिक परामर्श घेण्याचा प्रयत्न बाखतीनने या लेखामधून केला आहे. कालावकाशासंबंधी विवेचन करताना बाख्तीनने कादंबरीत अवतरणारे कालावकाशांचे विविध प्रकार सांगून कादंबरीतील कथनाला मूर्तता देणारी शक्ती या स्वरूपात कालावकाशासंबंधी तपशीलवार विवेचन केले आहे. ते सारांशरुपात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) ग्रीक रोमान्समधील साहसकाळ (नायकाच्या

सामान्य आयुष्यक्रमाबाहेर घडणाऱ्या घटना /वास्तव काळाच्या दोन क्षणांमधील कालातीत पोकळी - योगायोग - यादृच्छिकता आकस्मिकता यांना पूरक असा अत्यंत विस्तृत आणि अमूर्त असा परक्या जगाचा अवकाश - रस्त्याचा खुला कालावकाश)

२) दैनंदिन जीवनाची साहसकादंबरी (अग्रगामी साहसकाळ आणि चक्राकार स्वरूपाचा दैनंदिन काळ यांचे मिश्रण - योगायोगासोबतच नायकाच्या / पात्रांच्या कृती, त्यांचे निर्णय आणि त्याचे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्व यांनीही घटनांना वळण दिले जाते)

३) चरित्रकाळ (आयुष्याचा प्रवास - नायकगौरव खासगी आणि जाहीर संभाषितांना जोडणारा दिवाणखान्याचा अवकाश- उंबरठ्याची प्रतीकात्मकता - संथ गतीने पुढे जाणारा काळ)

४) साहसकाळातील चमत्कृतीयुक्त जग (नायकप्रधान साहसकादंबरी - साहसवीर नायकाच्या पुढाकाराने घडणाऱ्या चमत्कृतींना महत्त्व)

५) समूहजीवनसंबद्ध श्रमकाळ (काळाचे नवे सर्जक वृद्धीप्रधान स्वरूप- सर्जक कृती आणि वृद्धीच्या मापाने मोजला जाणारा लोकसाहित्यातील प्रतीके आणि प्रतिमायुक्त काळ - वास्तव भूमी आणि निसर्गाशी सेंद्रिय संबंध - सामूहिक मानवी श्रमांच्या परिमाणाने मोजला जाणारा काळ - कृषिजीवनातील ऋतूचक्र आणि कृषिजीवनसंबद्ध सण-उत्सवांना महत्त्व देणारा कालावकाशसंबंध - सामूहिक श्रम, सामायिक उत्पादन आणि समूहप्रधान उपभोग ही या काळाची वैशिष्ट्ये - श्रमाच्या कृतींच्या परिमाणामुळे 'श्रमकाळ' ही संज्ञा)

६) ऐतिहासिक काळ (बदलत्या उत्पादनसंबंधातून अवतरलेली प्रतीकात्मकता महत्त्वाची, व्यक्तिजीवनाला लाभलेले सामूहिकतेचे परिमाण नाहीसे होऊन समाज आणि व्यक्ती यांच्या काळाच्या जाणीवेत निर्माण झालेले अंतर - खासगीपणाच्या अवकाशाला आलेले महत्त्व - व्यक्तीच्या कालक्रमाशी समांतर पण त्याच्या वरच्या पातळीवर त्याच्याबाहेर ऐतिहासिकतेच्या उद्दिष्टासाठी येणार काळ हा राष्ट्र, राज्याचे, मानवजातीचे आयुष्यक्रम दाखवणारा प्रवाह या स्वरूपात कार्य करतो.)

कालावकाश हे काळाचे (काळ या जाणीवेचे) अवकाशामधे भौतिकीकरण करणारे प्राथमिक साधन म्हणून कार्य करतात. प्रतिरूपणाला मूर्तता देणारे केंद्र म्हणून तसेच संपूर्ण कथनकृतीला शरीर प्राप्त करून देणारी शक्ती या स्वरूपात हे कालावकाश आपल्यासमोर येतात. कथनकृतीमधील तात्त्विक आणि सामाजिक सामान्यीकरणे, कल्पना, कार्यकारणसंबंधांचे विश्लेषण यांसारखे सर्व अमूर्त घटक कालावकाशाकडे आकर्षित होतात आणि कालावकाशांच्या माध्यमातूनच शरीर (मूर्तरूप) प्राप्त करतात. या प्रक्रियेतून ते साहित्यकलेच्या प्रतिमांकन शक्तीला आपले कार्य करण्यास वाव देतात.

कथनकृतीच्या (कादंबरीच्या) रूपाची कालावकाशसंबद्ध मांडणी करून बाख्तीनने आपल्या समकालीन अमूर्तीकृत रूपविचाराला उत्तर देत मूर्त वास्तवाला थेटपणे भिडणाऱ्या रूपविचाराची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच कालावकाशांचे विविध प्रकार-उपप्रकार आणि संयोजने शक्य असतात हेही बाख्तीनच्या या मांडणीतून दिसून येते.

येथे एक गोष्ट स्पष्ट करायला हवी ती अशी की, कालावकाश म्हणजे केवळ कथनात्मकतेचा घटक नसून मूलतः ती एक ज्ञानात्मक संकल्पना आहे. बाख्तीनने सांगितलेल्या कालावकाशांच्या नमुन्यांपुरतीच कालावकाशाची संकल्पना मर्यादित नाही. त्याने सांगितलेले कालावकाशांचे प्रकार ही त्याच्यासमोर असलेल्या कथनात्म साहित्यकृतींच्या निरीक्षणातून मांडलेली काही प्राथमिक अथवा मूलभूत संयोजने आहेत. साहित्यव्यवहारात अशी अनेक पुनर्संयोजने वा पुनर्रचना शक्य असतात.

कालावकाश हे माणसांच्या जगण्याच्या शैलीशी संबंधित असतात. मानवी व्यवहाराने नियत केलेले, मानवी समाजसंस्कृतीने दिलेले असे विविध कालावकाश ही लेखकाजवळील कच्ची सामग्री असते. मानवी

इतिहासातील विशिष्ट काळाने अथवा मानवी संस्कृतीच्या विशिष्ट अवस्थेने निर्माण केलेल्या कालावकाशांना आपल्या कल्पनांच्या साहाय्याने लेखक वेगळ्या पातळीवर घेऊन जातात. कालावकाशांच्या या संयोजनामधून त्याला कथनकृतीमधे नैतिक (मूल्यात्मक) परिमाणे उभी करायची असतात.

कालावकाशासंबंधी बाख्तीनच्या मांडणीचा आढावा प्रस्तुत लेखकाने यापूर्वी मराठीतील 'शाळा' या मिलिंद बोकीललिखित कादंबरीतील कालावकाशसंबंधाविषयी विवेचन करताना घेतला आहे.[२] मराठीत सर्वप्रथम बाख्तीनच्या मर्मदृष्टींचा वापर करून मराठीत हरिश्चंद्र थोरात यांनी मराठी कादंबरीच्या रूपाचा वेध घेतला आहे. मराठी कादंबरीतील कालावकाशसंबंधांच्या गुंफणीचा विचार त्यांनी केला आहे.[३] याशिवाय मराठीतील काही कादंबऱ्या आणि कथासंग्रहांचे विश्लेषण करताना त्यांनी कालावकाशासंबंधीच्या मर्मदृष्टींचा वापर केला आहे.[४]

'आलोक' या कथासंग्रहातील कालावकाशांच्या संरचनेचा वेध घेताना आपण येथे वरीलप्रमाणे एखाद्या वाङ्मयीन परंपरेतील कादंबरीच्या रूपाचा ऐतिहासिक आढावा अथवा एखाद्या कादंबरीतील कालावकाशसंबंधांचे विश्लेषण नव्हे तर प्रथमच एका कथासंग्रहातील सहा वेगवेगळ्या कथांमधून मूर्तरूप धारण करणाऱ्या कालावकाशसंबंधांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करत आहोत. हे या उपक्रमाचे वेगळेपण याठिकाणी नोंदवणे आवश्यक आहे. कादंबरीप्रमाणे एकसलग कथानकरचना अथवा एकात्मीकृत संरचना नसताना अशा प्रकारचा शोध घेताना या लेखनामागील लेखकीय मूल्यदृष्टी हे या कथांना एकात्म करणारे सूत्र गृहीत धरून विश्लेषण करत आहोत.

'आलोक' या कथासंग्रहातील सहा कथांमधील कालावकाशसंबंधांचा वेध आपल्याला येथे घ्यायचा आहे. या कथांमधून चित्रित झालेले कालावकाश, त्यांची वैशिष्ट्यपूर्णता आणि या कालावकाशांच्या गुंफणीतून आशयाने धारण केलेला वैशिष्ट्यपूर्ण आकार येथे आपण लक्षात घेत आहोत. म्हणजेच या कथांच्या आकृतिबंध आणि आशय यांच्या परस्परसंबंधांचा शोध घेत आहोत, त्याचबरोबर या कथांच्या आकृतिबंधांचा आशय या अंगाने आपण आकृतिबंध अथवा रूपबंधाचा आशय शोधणे म्हणजेच या रूपबंधाच्या घटकांचे विश्लेषण करून त्यांच्या जुळणीमध्ये असणारी संघटनातत्त्वे निश्चित करण्याचा प्रयत्न करत आहोत. अशा रूपबंधाच्या घटकांचे एकमेकांच्या संदर्भातील महत्त्व अथवा गौणत्व यांचा शोध येथे अपेक्षित आहे. अर्थातच या कथांच्या संरचनेत रूपबंधाच्या कोणत्या घटकांना पृष्ठभूमीला ठेवले आहे आणि कोणते घटक पार्श्वभूमीदाखल आले आहेत यामधूनही या आशयद्रव्याकडे पाहण्याच्या लेखकीय मूल्यदृष्टीबद्दल काही भाष्य करणे शक्य होऊ शकेल.

प्रस्तुत लेखाचा विषय हा प्रामुख्याने कालावकाशाच्या तत्त्वाच्या माध्यमातून 'आलोक' या कथासंग्रहाच्या रूपाचे अथवा संरचनेचे विश्लेषण करणे आणि मूर्त वास्तवाशी तिचा अनुबंध उलगडणे, त्यामागील मूल्यदृष्टीचा वेध घेणे हा आहे. त्यामुळे या कथांमधील कालावकाशांचे स्वरूप स्पष्ट करणे आणि या कथांमधील आशयसूत्रांशी या कालावकाशांचे संबंध कोणत्या पातळीवरील आहेत याची चिकित्सा करणे, विविध कालावकाशांचे एकमेकांशी कोणत्या प्रकारचे संबंध आहेत याविषयीची मांडणी करणे तसेच या संरचना म्हणजे केवळ बाह्य अभिव्यक्तीवैशिष्ट्ये नसून ती आशयसूत्रांशी 'आतून' कशारितीने जोडलेली आहेत याचा वेध घेणे हा उद्देश या लेखामध्ये प्रामुख्याने ठेवला आहे.

कथनात्मक साहित्यप्रकारांना असलेला काळ आणि अवकाश यांचा संदर्भ हा साहित्यकृतीच्या भोवतालच्या जगाशी असणाऱ्या नात्याला मूर्त करत असतो.[५]

भोवतालच्या या जगाने, लेखकीय दृष्टिकोनामधून प्राप्त केलेले कथनरूप समजावून घेण्याचा प्रयत्न येथे

आपण करत आहोत. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर वास्तव जगाची लेखकाने साहित्यात केलेली पुनर्रचना ज्या मूल्यदृष्टीने केली असेल तिचा कालावकाशांच्या माध्यमातून वेध घेण्याचा प्रयत्न येथे आहे.

'आलोक' या कथासंग्रहातील सहा कथांमध्ये आलेल्या विविध कालावकाशांचे स्वरूप कसे आहे हे पाहाण्यापूर्वी स्थूलमानाने या कथांच्या आशयसूत्रांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

गावातील पारंपरिक सत्तेच्या संरचना आणि बदलत्या संदर्भात गरिबांचे शोषण आणि दमन यांची बदललेली रूपे हे सर्वसाधारणपणे या कथासंग्रहामधील बहुतेक सर्व कथांमागील प्रमुख आशयसूत्र आहे असे म्हणता येईल. मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील सरंजामी व्यवस्थेचे अद्यापही टिकून राहिलेले अवशेष, गावांमधील सत्ताधाऱ्यांच्या दोन पार्ट्यांमधील वैमनस्य, त्याचे साधन अथवा बळी बनणारे सर्वसामान्य लोक, लहानमोठ्या अडचणी, विशिष्ट प्रसंगी नाईलाजाने त्यांना घ्यावा लागलेला एखादा निर्णय आणि अशा सर्वच निर्णयांना लाभलेले कोणत्यातरी सत्तेच्या हितसंबंधाचे परिमाण असे या कथांच्या आशयसूत्राचे अमूर्तीकृत स्वरूपात वर्णन करता येईल.

सामान्य शेतकरी, स्त्रिया, दलित, भूमिहीन यांचे या चक्रात भरडले जाणे ही काही अधिक मूर्त स्वरूपाची आशयसूत्रे या कथांमधून दिसून येतात. 'चिरेबंद', 'ओझं', 'खुंदळण', 'जीत', 'कुभांड' आणि 'वळण' या सहाही कथांची कथानकरचना साधारणपणे पुढीलप्रमाणे दिसून येते.

मध्यवर्ती पात्राच्या आयुष्याला वळण देणारी एखादी धक्कादायक घटना (जवळच्या अथवा दूरच्या) भूतकाळात घडून गेलेली असते आणि तिचे परिणाम टाळण्याचे अथवा तिचे अर्थनिर्णयन करण्याचे प्रयत्न याभोवती बहुतेक सर्व कथांचे कथानक फिरत असलेले दिसते. 'चिरेबंद' या कथेतील निवेदक प्रसादच्या पंत आजोबांचा हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या काळात झालेला खून, 'ओझं' या कथेतील निवेदक गिरीधरच्या शेतकरी असलेल्या थोरल्या भावाची, मुरलीची आत्महत्या, 'खुंदळण'मधील दत्तराव या सामान्य कार्यकर्त्याचा लाल बावटा पक्षाला सोडून काँग्रेस पक्षात प्रवेश, 'जीत'मधील कौसाबाईच्या ग्रामपंचायत सदस्य असलेल्या नवऱ्याचा अपघाती मृत्यू, 'कुभांड' या कथेत काही ध्यानीमनी नसताना लहान मुलावरून झालेल्या छोट्याश्या भांडणामुळे मालीपाटील (त्याचबरोबर गवळण आणि अंकुश) यांच्या आयुष्यात मोठी खळबळ माजते आणि 'वळण' कथेत प्रयाग या शाळकरी मुलीच्या आयुष्यातही नकळत कोणाच्यातरी भांडणाची (खुनाची) साक्षीदार असणे यासारख्या सुरुवातीला किरकोळ वाटणाऱ्या घटनेमुळे मोठे धक्कादायक परिणाम घडून येतात. येथे आपल्या अभ्यासाच्या केंद्रस्थानी कथाशयापेक्षा कथनरूपाचे विश्लेषण असल्यामुळे अर्थातच कथेतील घटनांपेक्षा त्यांच्या कालावकाशसंबद्ध मांडणीला आणि त्यामागील मूल्यदृष्टीला अधिक महत्त्व दिले आहे.

या कथासंग्रहात ग्रामजीवनाचे, तेथील व्यक्तींच्या जीवनाचे चित्रण येत असले तरी हे चित्रण कृषिकर्माशी संबद्ध चित्रण नाही. या कथांमधील बहुतेक महत्त्वाच्या घटना रानाच्या (शेताच्या) अवकाशात घडत नाहीत तर त्या गावाच्या रहिवासी क्षेत्रात घडतात. कृषिकर्माशी संबंधित ऋतूचक्राशी जोडल्या गेलेल्या आवर्ती स्वरूपाच्या घटनांना येथे फारसे महत्त्व नाही. म्हणजेच या कथांमधे कृषिकर्मसंबद्ध जीवन, पारंपरिक गावगाडा इत्यादी गोष्टी पृष्ठभूमीला नसून त्या पार्श्वभूमीदाखलच राहातात. या कथांच्या अवकाशात अशा घटनांना फारसा वाव नाही. मग कोणत्या घटना या कथांचा अवकाश व्यापतात? तर ग्रामजीवनात नव्याने प्रविष्ट झालेल्या, गावच्या रहिवासी क्षेत्रातील मानवी संबंधांना नवा आयाम देणाऱ्या आधुनिक व्यवस्थांनी प्रेरित झालेल्या, दैनंदिन श्रमकाळाला छेद देणाऱ्या आणि कृषिकर्मसंबद्ध अवकाशाबाहेरच्या अशा काही अपारंपरिक स्वरूपाच्या घटना या कथांच्या अवकाशावर

प्रभाव गाजवताना दिसतात. उदा. शिक्षणव्यवस्था (शाळा-महाविद्यालयातील शिक्षण आणि शिक्षणाविषयीच्या चर्चा), निवडणुकीचे राजकारण (निवडणूक जिंकण्यासाठीची व्यूहरचना आणि त्याच्याशी संबंधित कटकारस्थाने), गावाला शहराशी जोडणारा रस्ता, सरकारी कार्यालये (कोर्टकचेऱ्या, वकील, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, हेडमास्तरांचे तसेच जिल्हाधिकाऱ्यांचे कार्यालय तसेच पोलीसस्टेशनमधील चौकशी), चहाच्या टपरीवरील रिकामटेकड्या लोकांचे पत्त्यांचे डाव यामधून या कथेला केवळ परंपरागत ग्रामजीवनातच रमायचे नाही तर पारंपरिक चाकोरीबद्ध ग्रामजीवनाच्या परीघाबाहेरच्या अधिक व्यापक मानवी संबंधांकडे तिचा रोख आहे असे म्हणता येईल.

जिच्या आधारे आपण 'आलोक' या कथासंग्रहाचे विश्लेषण करत आहोत ती कालावकाश ही संकल्पना सोदाहरण समजावून घेण्यासाठी 'आलोक' या कथासंग्रहातीलच काही उदाहरणे पुढीलप्रमाणे विचारात घेता येतील. या कथासंग्रहातील पहिलीच 'चिरेबंद' नावाची जी कथा आहे त्यात 'वाडा' हा जो उल्लेख येतो तो केवळ वर्णनात्मक स्वरूपाचा नाही अथवा केवळ एका रहिवासी इमारतीचा म्हणजेच निव्वळ अवकाशसूचक उल्लेख नाही तर कथानकात येणारा वाड्याचा उल्लेख हा मूल्यभारित स्वरूपातील उल्लेख आहे. या कथेच्या एकंदर आशयाचा विचार केल्यास वाडा हे स्थितीशीलतेचा निर्देश करणारे अवकाशसूचक चिन्ह जसे आहे त्याचप्रमाणे भूतकाळाला चिकटून राहणारे असे ते कालदर्शक चिन्हही ठरते या अर्थाने 'वाड्याचा कालावकाश' असा उल्लेख या कथनात्मक संहितेच्या संदर्भात करता येतो. परंपरा आणि त्या परंपरेतून प्राप्त झालेली सत्ता शाबूत राहावी तिच्यावरील आपली पकड सुटू नये यासाठीचे जाणीवपूर्वक प्रयत्न या वाड्याच्या कालावकाशात होत जातात. बाह्यत: वाड्याचा कालावकाश हा पारंपरिक ग्रामीण कथा-कादंबऱ्यांतील कालावकाश आणि पात्रांच्या परंपरागत मूल्यव्यवस्थेशी जोडणारा आहे असे एका बाजूने वाटते. सर्वसाधारणपणे पारंपरिक ग्रामीण कथेत पात्रे ही स्थिर स्वरूपाची, परंपरागत मूल्यव्यवस्थेत मुरलेली तिच्याबाहेर फारशी न पडणारी असतात. अशा ग्रामीण कथेमध्ये श्रमकाल प्रभावी असतो. खुले, निसर्गसन्निध, परंपरागत तसेच समूहाशी बांधलेले अवकाश केंद्रस्थानी असतात. परंपरेचा गौरव करण्याच्या दृष्टीने परंपरागत (अखाडा, चावडी, जत्रा, मंदिर इ.) समूहसंबद्ध कालावकाशांचे उदात्तीकरण असते. गावगाड्याच्या एका व्यापक कालावकाशाच्या चौकटीत कथेतील पात्रांचे व्यवहार चालतात. किंबहुना स्मरणरंजन आणि परंपराप्रियता आणि तेथील परिस्थितीतून आणि संभाषितातून येणारा किस्सेवजा विनोद हे घटक पारंपरिक ग्रामीण कथेच्या ग्रामीणतेचे निदर्शक अथवा तिला आवाहकता प्राप्त करून देणारे असतात. पारंपरिक ग्रामीण कथेतील कालावकाशांची संरचना ही पारंपरिक कृषिसंबद्ध अशा श्रमकाळाच्या पुनरावर्तकतेने झालेली असते. अगदी वाड्यासारखा कालावकाश घेतला तरी श्रमकाळाच्या पुनरावर्तकतेने निर्माण झालेल्या स्थिर व्यवस्थांशी नाते सांगणारा हा परंपरागत कालावकाश असतो. 'आलोक' या कथासंग्रहातील कथांमधून या परंपरागत स्थितीशील कालावकाशाला कोणती नवी परिमाणे दिली आहेत ते आपण पुढे अधिक सविस्तर चर्चेत स्पष्ट करणार आहोत.

कालावकाशाच्या संकल्पनेसंदर्भात रस्ता हा आणखी एक कालावकाश आपण चर्चेला घेऊ. रस्ता हा गतिशीलतेचे सूचन करणारा एक अवकाश असून भविष्यकाळाकडे रोखलेला असा कालावकाश आहे. बाख्तीनने चर्चा केल्याप्रमाणे साहसकाळाला आवाहन करणारा असा हा अवकाश असतो. रस्त्याचा अवकाश हा नेहमीच परंपरागत स्थिर अवकाशांना शह देणारा, स्थैर्याला अथवा स्थितिशीलतेला उद्ध्वस्त करणारा अवकाश असतो. 'चिरेबंद' या कथेतील वाड्यासमोरचा मंदिराकडे येणारा रस्ता त्यावर चालणारी माणसे,

गड्यासोबत शेतात जाताना रस्त्यात वाटेत लोकांशी झालेली भेट, गावाकडे येताना गाडीतून फाट्यावर उतरून चालत येताना दिसलेली भली मोठी दांडगी बाई आणि तिने आजीकडे बघून थुंकणे, तिरस्कार दर्शविणे, आजोबांचा खून करून परत बाहेरच्या रस्त्यावर उडी टाकून पळून गेलेली दोन खुनी माणसे, वाड्याच्या चिरेबंदी पायऱ्या उतरायला हव्यात असे जणू खुणावणारा वाड्यासमोरचा ओलसर रस्ता, गड्याच्या घराकडे जाणारा मुख्य रस्त्याला जोडलेला बोळीचा रस्ता, आजीच्या सत्काराच्या आदल्या दिवशी विठ्ठलमंदिरासमोरून जाणाऱ्या रस्त्याने गेल्यानंतर एक म्हातारा माणूस गप्पा मारता मारता पंतांच्या खुनाबाबतच्या रहस्याची उकल करतो, सरकारी सत्कारावरून सरकारी वाहनातून वाड्याकडे परत येताना आजोबांच्या हौतात्म्याबद्दल अथवा जुलमी शासकांबद्दल जी चर्चा होते तीही रस्त्यातच. अशी रस्त्याची नानाविध रूपे आढळतात.

विशिष्ट कालावकाशांचे पात्रांच्या वर्तनावर कोणते प्रभाव अथवा छाप असतात? या संदर्भात कालावकाशांचे महत्त्व समजून घ्यायचे तर प्रथम सर्वसामान्य व्यवहारातील काही ढोबळ उदाहरणे समोर ठेवता येतील. कार्यालयात कर्मचारी म्हणून काम करणारा मनुष्य कामकाजाच्या वेळी कार्यालयाच्या औपचारिक कालावकाशात ज्या तऱ्हेने वागत-बोलत असतो त्यापेक्षा स्वतःच्या घरात वावरताना त्याचे वागणेबोलणे पूर्णपणे वेगळे असते किंवा शाळाकॉलेजातील वर्गात विद्यार्थी आणि घरात पाल्य या भूमिकेतून वावरणाऱ्या कुमारवयीन अथवा तरुण व्यक्तीच्या समवयस्क मित्रांसोबत सुट्टीत पिकनिकला गेल्यानंतरच्या वर्तनातील तफावत ही कालावकाशाच्या प्रभावाचीच उदाहरणे आहेत. अशी असंख्य उदाहरणे आपल्याला नित्याच्या व्यवहारात पाहवयास मिळतात. वरील उदाहरणांमध्ये जे व्यवहारातील व्यक्तींबाबत घडते तसेच काहीसे साहित्यकृतीतील पात्रांच्याही कृतीउक्तींबाबतही घडत असते. अर्थात या पात्रांना कोणत्या कालावकाशात ठेवायचे, पर्यायाने त्याच्याकडून कोणत्या कृती घडवायच्या, त्यांच्या तोंडी कोणत्या उक्ती ठेवायच्या हा लेखकीय मूल्यदृष्टीने कळतनकळत घेतलेला एक नैतिक निर्णय असतो.

कालावकाशांच्या संरचनेमधून लेखक अंतिमतः एक मूल्यात्म संरचना कशी उभारत असतो हे समजून घेण्यासाठी यापूर्वी आपण पाहिलेले वाड्याचे आणि रस्त्याचे उदाहरण पुन्हा एकदा समोर ठेवता येईल. लेखकीय मूल्यदृष्टीने 'आलोक' या कथासंग्रहातील कथांमधून कालावकाशांची जी संरचना केली आहे त्यामधून वाड्यासारख्या स्थितीशील आणि भूतकाळसन्मुख कालावकाशाला एक वेगळे परिमाण प्राप्त करून दिल्याचे दिसते. येथे या वाड्याच्या कालावकाशाशी पूरक अथवा विरोधी कालावकाशाची संरचना कशी केली आहे ते पाहिले असता हा मुद्दा अधिक स्पष्ट होऊ शकेल. वाड्याच्या खाजगी मालकीसूचक कालावकाशासमोरच गावातील एक सार्वजनिक आणि तुलनेने खुला असा विठ्ठलमंदिराचा कालावकाश ठेवला आहे. सर्वसाधारणपणे मंदिरासारखा कालावकाश हा एरवी पारंपरिक आणि जुन्या मूल्यांकडे निर्देश करणारा कालावकाश असला तरी त्याचे कथक (निवेदक - Narrator) असणाऱ्या प्रसादच्या कथनामधून घडणारे दर्शन हे वाड्याच्या कालावकाशासमोरील मंदिराचे बाहेरून घडणारे दर्शन असल्याने येथे केवळ वाड्याच्या बंदिस्त एकांतसूचक कालावकाशासमोर गजबजलेले मंदिर हा कालावकाश वर सांगितल्याप्रमाणे खुल्या कालावकाशाचे सूचन करत नेमका उलटा परिणाम साधतो.

कथक प्रसादला बंदिस्त वाड्यात आजी जी काही माहिती सांगते तिला छेद देणारी बहुतेक माहिती कथकाला (अथवा त्याच्या वाचकाला) रस्त्याच्या खुल्या अवकाशात दिली जाते आणि एकूण त्या माहितीची रचना अशी केली जाते की वाड्यात

आजीकडून मिळालेली संदिग्ध माहिती अथवा वाड्याच्या अंतर्गत येणारे आणखी काही खासगी कालावकाश उदा. अलमारीत लाल कापडात बांधलेल्या जुनाट धूसर कागदपत्रांवरील अगम्य अशा मोडी लिपीतील मजकूर यापेक्षा वाड्याबाहेरच्या प्रामुख्याने रस्त्याच्या खुल्या अवकाशात नित्याच्या व्यवहारभाषेत आलेली संभाषिते अधिक विश्वासार्ह होत जातात. अशा रीतीने वाड्याच्या परंपरागत स्थितिशील कालावकाशाला छेद देणारा रस्त्याचा कालावकाश अत्यंत प्रभावी रीतीने या कथेत येतो. पूर्वी पाहिल्याप्रमाणे या कथेत विठ्ठलमंदिर, दहा एकर जमिनीच्या खटल्यादरम्यान प्रतिवादी बाईने रानात ठोकलेले पाल, शेतात आणि वाड्यात काम करणाऱ्या गड्याचे साधेच घर, प्रसादच्या नोकरदार वडिलांनी आपल्या बदलीच्या गावी बांधलेले घर असे अवकाश या चिरेबंदी सावकारी वाड्यासमोर ठेवून विविध द्वंद्वात्मक संरचना उभारलेल्या दिसतात.

रस्त्याच्या कालावकाशाबाबत बोलायचे तर या कथासंग्रहाच्या आशयासंदर्भात ग्रामजीवनातील पुनरावर्तकता तसेच ऋतुचक्राशी बांधला गेलेला श्रमकाळ यापासून सुटका करून देणारा, नव्या अज्ञात शक्यतांकडे घेऊन जाणारा असा एक खुला कालावकाश म्हणून येथे रस्त्याचा कालावकाश समोर येतो. गावाच्या सीमेपलीकडे तालुक्याचे गाव, निमशहरी भाग अथवा शहर अशा ठिकाणी घेऊन जाणारा हा गतिसन्मुख कालावकाश आहे. कालावकाशाच्या संरचनेची ही घडण कोणत्या मूल्यांनी झाले आहे हे पाहिले तर परंपरेला छेद देणारी, परंपरागत श्रेणीरचनेला आव्हान देणारी, बंधनांना नकार देणारी अशी ही आधुनिकतेची, समानतेची, व्यक्तिस्वातंत्र्याची मूल्ये आहेत आणि लेखकीय संरचनेतून याच मूल्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्षरित्या पुरस्कार केला आहे हे या कथांमधून दिसून येते.

याची 'ओझं' या कथेतील उदाहरणे म्हणजे गावात आणि कृषिसंबद्ध जीवनचरकात पिळला जाणारा मुरली हा कथक गिरीधरचा अशिक्षित भाऊ, याने शाळेला सुरुवातीपासून नकार दिला आहे. शाळेच्या आधुनिक कालावकाशाला दिलेल्या या नकारामुळे कष्टमय आयुष्याच्या दुष्टचक्रात तो अधिकाधिक गुंतत जाऊन उद्ध्वस्त होत जाताना दाखवला आहे. त्याला आणि त्याच्या बायकोमुलीला शेतात राबण्याला पर्यायच नाही. मुलीचे जिल्हापरिषदेच्या मराठी शाळेतील शिक्षणही कसेबसे होत असलेले असे आहे. दुष्काळ, नापिकी, शेतमालाला भाव नसणे, कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता आणि अखेर विवंचना आणि नैराश्यातून शेतातच केलेली आत्महत्या ही त्याची परिणती.

याउलट शाळाकॉलेजात शिक्षण घेऊन प्राध्यापकाची प्रतिष्ठेची नोकरी करणारा गिरीधर आणि त्याची बायकोमुले गावात अथवा शेताकडे जातात ती विरंगुळा, सुट्टी, मनोरंजन म्हणूनच. त्याची मुले इंग्रजी माध्यमाच्या महागड्या शाळेत शिकू शकतात. मुरलीला पतसंस्थेत जावे लागते ते कर्ज मागायला तर गिरीधर बँकेत अथवा एटीएममधे जातो तो स्वत:च्या मालकीचे पैसे काढून गावच्या थोरल्या भावाला द्यायला. काबाडकष्ट करूनही कर्जबाजारी आणि विवंचनाग्रस्त असलेला मुरली आणि संपकाळात काम बंद असूनही बाजारात जाऊन खरेदी करणारा गिरीधर इत्यादी. थोडक्यात 'ओझं' या कथेत गिरीधर आणि मुरली या पात्रांचे स्वरूप नियत करणारा अत्यंत प्रभावी कालावकाश आहे तो शाळा-कॉलेज हा शिक्षणव्यवस्थेशी संबंधित आधुनिक कालावकाश. रान आणि शाळा हे कालावकाश अशा रीतीने परस्परांसमोर किंवा परस्पराविरोधी ठेवून लेखकाने आधुनिकता आणि तिच्यातून प्राप्त झालेल्या शिक्षणाकडे आपला स्पष्ट कल दाखवला आहे. या कथासंग्रहातील कोणत्याही कथांमधून ग्रामजीवनाचे अथवा तेथील पारंपरिक व्यवस्थांचे उदात्तीकरण येत नाही.

या कथांमधील महत्त्वाच्या घटना आणि पात्रे यांच्यातील आणि कालावकाशसंबद्ध नात्यासंदर्भात

काही निरीक्षणे पुढीलप्रमाणे मांडता येतील.

'आलोक' या कथासंग्रहातील जवळपास प्रत्येक कथेच्या मुळाशी (केंद्रस्थानी नव्हे!) असलेली घटना ही आकस्मिक आघाती स्वरूपाची असून दूरगामी परिणाम घडवून आणणारी, संबंधित पात्राच्या आयुष्याला वेगळे वळण लावणारी घटना आहे. अर्थात या घटनेचे प्रत्यक्ष दृश्याच्या स्वरूपातील सादरीकरण न येता ते कथकाच्या माध्यमातून येते अथवा ती घटना कथकाला कोणातरी अन्य पात्राच्या माध्यमातून आढाव्याच्या स्वरूपात सांगितली गेलेली अथवा ती घटना घडून गेल्यावर बऱ्याच काळाने त्याच्यापर्यंत पोहोचलेली अशी आहे अथवा ती घटना घडत असताना कथक तिथे प्रत्यक्षात उपस्थित नसणे त्याने नाईलाजाने त्या घटनेचा अथवा अन्य कोणीतरी घेतलेल्या निर्णयाचा, दबावाचा, प्रलोभनाचा स्वीकार करणे असे सर्वसाधारणपणे या कथांमधील केंद्रवर्ती पात्राचे अथवा कथकाचे या घटनांशी नाते असल्याचे दिसते. म्हणजेच कथेच्या मुळाशी असणाऱ्या घटनेशी कथकाचे काळ आणि अवकाश यापैकी एका अथवा दोन्ही दृष्टीने अंतर राखले गेल्याचे दिसते.

कथाकादंबरीसारख्या कथनात्म संहितेत कथक हा सर्वसाधारणपणे लेखकीय दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करत असतो. कालावकाशांची वरीलप्रमाणे संरचना करण्यामागे आणि लेखकीय दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पात्रांमधे आणि घटनांमधे असे अंतर राखण्यामागे कोणती मूल्यदृष्टी आहे? या प्रश्नाकडे आता वळता येईल. ग्रामसंस्कृती आणि कृषिजीवन यांचा दैनंदिन जीवनाचा, पुनरावृत्त स्वरूपाचा अथवा पुनरावृत्त होण्याची क्षमता असणाऱ्या घटनांचा कालावकाश टाळून या कालावकाशांना छेद देणारे (नवे, गतिशील, आधुनिक, शहरी इ.) साहसकाळाला आवाहन करणारे कालावकाश या स्थिर कालावकाशांच्या समोर ठेवण्याची एक द्वंद्वात्मक स्वरूपाची कालावकाशाची संरचना या कथांमधून दिसून येते हे आपण यापूर्वीच पाहिले आहे. येथे कादंबरीच्या तुलनेत अवकाशांशी संबंधित तपशीलांचे अल्पत्व स्वाभाविकच म्हणावे लागेल. घटनाप्रसंग, संवाद आणि कालावकाशांच्या उल्लेखांच्या पुनरावृत्तीचे प्रमाणही कादंबरीच्या तुलनेत अत्यंत मर्यादित दिसते. या कथा तशा दीर्घ भाषिक अवकाश व्यापणाऱ्या असल्या तरी कादंबरीच्या तुलनेत कथेचा भाषिक अवकाश तोकडाच असल्याने अवकाशाचे वैपुल्य आणि त्यांचे परस्परांशी व्यामिश्र स्वरूपाचे नाते असा प्रकार न दिसता साधारणपणे एका अवकाशासमोर त्याला छेद देणारा दुसरा एखादा अथवा दोन अवकाश ठेवण्याची आणि त्या अवकाशात वावरणाऱ्या पात्रांची त्यांच्या कृतींची घडणाऱ्या घटनांची द्वंद्वात्मक रचना करण्याची प्रवृत्ती या कथांमधून दिसून येते. या द्वंद्वात्मक संरचनेचे काही तपशील पुढीलप्रमाणे सांगता येतील. उदा. 'चिरेबंद' या कथेत खासगी मालकीच्या बंदिस्त चिरेबंदी सावकारी वाड्याच्या समोर (आध्यात्मिक लोकशाहीशी संबंधित वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत असणाऱ्या) विठ्ठल मंदिराचा खुला सार्वजनिक अवकाश प्रतिकात्मक स्वरूपात ठेवणे अथवा या दगडी वाड्यातील शोषक सावकाराशी लढा देण्यासाठी प्रतिवादी बाईने रानात कापडी पाल टाकून लढा देणे, निवेदक प्रसादने या दगडी वाड्यामधून बाहेर पडून गड्याच्या साध्याच घराच्या बाहेर पटांगणात ताजे चवदार जेवण करणे, त्याचप्रमाणे 'ओझं' या कथेत गावच्या घराच्या आणि शेताच्या अवकाशाच्या समोर अनुक्रमे शहराचा, शहरातील खोलीचा, शहरातील घराचा आणि महाविद्यालयाचा अवकाश हे अवकाश ठेवले जातात तर 'खुंदळण' या कथेतील दत्तरावाला नव्या काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर गावातील काँग्रेसचा नेता असणाऱ्या नानांच्या वाड्यातील बैठकीच्या खोलीत राजरोसपणे न जाता चोरून प्रवेश करावा लागणे. याउलट तो ज्या डाव्या पक्षातून बाहेर पडलेला असतो त्या पक्षाच्या जुन्या नेत्याशी (आपले राजकीय गुरू

कॉम्रेड अप्पा यांच्याशी) त्याची जी भेट होते ती शेताच्या खुल्या अवकाशात. इतरही कथांमध्ये अशा प्रकारची अवकाशाच्या द्वंद्वात्मक नात्याची उदाहरणे पाहायला मिळू शकतील.

गावच्या साचेबंद सामूहिक प्रभुत्वाच्या अवकाशातून सुटका करून घेण्याच्या आणि गावातील इतर लोकांपेक्षा तसेच आपल्या मागच्या पिढ्यांपेक्षा वेगळे आयुष्य जगण्याच्या दृष्टीने या संग्रहामधील बहुतेक कथांच्या केंद्रस्थानी असणाऱ्या काही व्यक्ती (पात्रे) गावाच्या अवकाशाला आणि तेथील चाकोरीबद्ध आयुष्याला छेद देणाऱ्या अवकाशाची निवड जाणीवपूर्वक करताना दिसतात. यात प्रामुख्याने शाळा (शिक्षणव्यवस्था) हा कालावकाश बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आलेला दिसतो. उदा. 'चिरेबंद'मधील सावकारी जमीनदारी करणाऱ्या पंतांचा खून झाल्यानंतर त्यांचा मुलगा शिक्षण घेऊन पुढे स्वतःही शिक्षणव्यवस्थेत प्रविष्ट होतो (शिक्षक बनतो) आणि आपल्या बदलीच्या नोकरीच्या गावीच घर बांधून चिरेबंद वाड्याला आणि तत्संबंधित मूल्यव्यवस्थेला नकार देतो किंवा 'ओझं'मधील गिरीधर आणि 'वळण'मधील प्रयाग यांच्यासाठीही शेतातलं कष्टाचं आणि गावाशी बांधील जगणं नाकारून आयुष्याला नवं वळण देण्यासाठी शाळा महत्त्वाची ठरते. रान (शेत) विरुद्ध शाळा ही अवकाशाची द्वंद्वात्मक मांडणी ही व्यक्तीने सामूहिक प्रभुत्वाला दिलेल्या अशा अर्थपूर्ण नकाराच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

या सर्व कथांबाबत काळाचा विचार करायचा झाल्यास (जवळच्या अथवा दूरच्या) भूतकाळाचा एकूण कथेवर अधिक प्रभाव दिसतो. वरकरणी कथा सांगणारे पात्र अथवा केंद्रवर्ती पात्र हे वर्तमानकाळात वावरत असले तरी भूतकाळात घडलेल्या घटना त्याच्या कथनावर, कथनवर्तमानावर तसेच वर्तमानातील वर्तन, निर्णय आणि संभाषितावर प्रभाव राखून असल्याचे दिसते. अवकाश आणि काळाच्या अंतरामुळे या कथकपात्राच्या अथवा मध्यवर्ती पात्राच्या नजरेआड किंवा दूरच्या भूतकाळात घडलेल्या घटनेभोवती कथा रचली जाते. काळ आणि अवकाशाच्या या अंतरामुळे कथेत त्या घटनेविषयीची माहिती कथन करणाऱ्या पात्राला (आणि वाचकालाही) तुकड्यातुकड्याने मिळत जाते. ती घटना नेमकी कशी घडली?, त्यामागील कार्यकारणभाव अथवा हेतू कोणता असावा? हे शोधण्याचा आकृतिबंध यामधील बहुतेक कथांना लाभला आहे. म्हणजेच वाचकाची, कथकाची, साक्षीदार पात्राची अथवा मध्यवर्ती पात्राची त्या घटनेसंबंधीची ज्ञानाची पातळी मर्यादित ठेवून काही प्रमाणात रहस्यकथांसारखी या कथांची संरचना झाल्याचे दिसते. रहस्यकथांसारख्या संरचनेचाही परिणाम भावनांपेक्षा तर्काच्या कक्षेत कथेला आकर्षित करण्याकडे होतो हे येथे नमूद करता येईल.

येथे कथाशयाच्या आणि कथनरूपाच्या दृष्टीने एक रोचक गोष्ट नमूद करायला हवी, ती म्हणजे लेखकीय दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करणारी पात्रे भूतकाळापासून आणि प्रभावी असणाऱ्या प्रस्थापित स्थिर अवकाशांपासून मुक्तता करून घेण्यासाठी काही निर्णय घेतात, पर्यायी अवकाशांची निवड करतात असे दिसते. मात्र कथेच्या निष्कर्षात्मक अथवा परिणतीप्रधान भागात मात्र पारंपारिक अवकाश आणि तेथे वावरणाऱ्या (सत्ताधारी/प्रस्थापित हितसंबंधी) व्यक्ती त्यांची स्थिर मूल्यव्यवस्था, त्यांचे निर्णय तसेच त्यांच्या कृती आणि संभाषिते अंतिमतः प्रभावी ठरताना दिसतात. उदा. 'चिरेबंद' या कथेतील प्रसादला बाहेर जावेसे वाटूनही तो वाड्यातून सहसा बाहेर पडू शकत नाही किंवा याच कथेत तुलनेने बंडखोर अथवा खुला असलेला रानातील पालाचा अवकाश कितीही आकर्षक अथवा आदर्शवत वाटला तरी त्याचा पराभव होताना दिसतो. 'ओझं' या कथेतील गिरिधरचे वर्तमानातील एकूण जगणे शहरात अथवा निमशहरी भागात असले तरी त्याचा ओढा आणि त्याचे संभाषित मात्र गावाशी आणि तिथे असणाऱ्या त्याच्या कुटुंबाशी बांधले गेलेले दिसते.

'खुदळण' आणि 'जीत' या कथांमधील दत्तराव आणि कौसाबाई यांना कोणत्यातरी वरच्या सत्ताधाऱ्याच्या निर्णयामध्ये नाईलाजाने सहभागी व्हावे लागते. 'वळण' या कथेमधील शाळेत हुशार असणारी प्रयाग गावातील सत्तासंघर्षातून पडलेल्या खुनाची नकळत साक्षीदार झाल्यामुळे त्या लोकांच्या दबावातून नाईलाजाने गावाबाहेरील वसतीगृह असलेल्या मोठ्या शाळेत जाते. बाह्यत: त्यांचा लौकिकदृष्ट्या फायदा झाला असला तरी आतून मात्र काहीतरी हरवल्याची, कशापासून तरी तुटल्याची जाणीव त्या पात्रांच्या कृती आणि उक्तींमधून प्रकट होताना दिसते.

'आलोक' या कथासंग्रहातील एकंदर कालावकाशसंबंधांचा विचार केला असता असे दिसून येते की कथा या साहित्यप्रकाराच्या एककेंद्री अवकाशात परंपरा विरुद्ध आधुनिकता, समूह विरुद्ध व्यक्ती, पारंपरिक स्थिर संरचना विरुद्ध आधुनिक गतिशील संरचना अथवा व्यवस्था अशी द्वंद्वात्मक रचना या कथासंग्रहात केली आहे. मूल्यात्मकदृष्ट्या या परंपरेपासून स्वत:ला मुक्त करू इच्छिणाऱ्या व्यक्तींचा परंपरेशी संघर्ष आणि या संघर्षाला पूरक अशा नव्या कालावकाशांशी जोडून घेण्याची त्यांची धडपड या कथांमधून दिसून येते. मात्र त्यासोबतच या पात्रांची पारंपरिक कालावकाशांशी आणि तत्संबंधित मूल्यव्यवस्थेशी असणारी बांधिलकी पूर्णपणे संपलेली नाही. त्याचबरोबर अंतिम न्याय देताना लेखकाने आदर्शाऐवजी वास्तवाला झुकते माप दिले आहे. या अर्थाने समाजवास्तवाकडे डोळेझाक न करता आधुनिकतेच्या मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या, समाजवास्तवातील आणि व्यक्तिजीवनातील विविध ताण आणि अंतर्विरोध अधोरेखित करणाऱ्या, तळागाळातल्या शोषित-वंचित व्यक्तींच्या दृष्टिकोनातून बदलत्या ग्रामवास्तवाचे चित्रण करणाऱ्या कथा असे आसाराम लोमटे यांची 'आलोक' या कथासंग्रहातील कथांचे स्वरूप आहे असेच या सर्व कालावकाशांच्या संरचनेच्या विश्लेषणामधून म्हणता येईल.

संदर्भ :

१. Bakhtin M.M. The Dialogic Imagination, Ed. by Michael Holquist, University of Texas Press, -ustin, Ninth printing, 1994.

२. औटी शैलेश, ''शाळा'मधील कालावकाशसंबंध', मुक्त शब्द, जुलै २०१०.

३. थोरात हरिश्चंद्र, 'कादंबरीविषयी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, जुन २००६.

४. थोरात हरिश्चंद्र, 'कथनात्म साहित्य आणि समीक्षा', शब्द पब्लिकेशन, मुंबई, पहिली आवृत्ती, ११ जुलै २०११

५. थोरात हरिश्चंद्र, 'मूल्यभानाची सामग्री', शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१६, पहिली आवृत्ती, पृ. २५३